बीजमंत्र

# हरभरा लागवडीसाठी सुधारित वाणांचा वापर उपयुक्त



डॉ. रमेश भदाणे
डॉ. व्ही.आर. पाटील
डॉ. एस.टी. आघाव
(मो.नं. ९४२१७३७७०५)
कडधान्ये व तेलबिया संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र,
(महात्मा फुले कृषी विद्यापीठ), पंढरपूर





देशी हरभऱ्याचे विजय, विशाल, दिग्विजय, साकी ९५१६, जाकी ९२१८ आणि फुले विक्रम हे वाण अतिशय चांगले आहेत. काबुली वाणांमध्ये विराट, काक-२, कृपा, पी.के.व्ही. ४ हे वाण अधिक उत्पादन देणारे आहेत. यापैकी विजय हा वाण कोरडवाहू शेतीसाठी अतिशय चांगला आहे. विशाल हा वाण टपोऱ्या दाण्यांचा आणि मर रोग प्रतिकारक आहे. राजस हा वाण देशातील पश्चिम- उत्तर विभागाकरिता प्रसारित झाला आहे. तथापि या वाणाने महाराष्ट्रामध्ये देखील अतिशय चांगले उत्पादन दिले आहे.

हरभऱ्याचे अनेक सुधारित वाण आहेत म्हणून चाफा, अन्निगेरी, एन. ५९, एन. ३१, बी.डी.एन. ९-१, विकास, विश्वास असे रोगाला बळी पडणारे जुने वाण अथवा स्थानिक वाण न वापरता सुधारित वाण पेरणीसाठी वापरावे. देशी हरभऱ्याचे विजय, विशाल, दिग्विजय, साकी ९५१६, जाकी ९२१८ आणि फुले विक्रम हे वाण अतिशय चांगले आहेत. काबुली वाणांमध्ये विराट, काक-२, कृपा, पी.के.व्ही. ४ हे वाण अधिक उत्पादन देणारे आहेत. यापैकी विजय हा वाण कोरडवाहू शेतीसाठी अतिशय चांगला आहे. विशाल हा वाण टपोऱ्या दाण्यांचा आणि मर रोग प्रतिकारक आहे. राजस हा वाण देशातील पश्चिम- उत्तर विभागाकरिता प्रसारित झाला आहे. तथापि या वाणाने महाराष्ट्रामध्ये देखील अतिशय चांगले उत्पादन दिले आहे. विहार हा काबुली वाण दक्षिण भारताकरिता प्रसारित झाला आहे. या वाणांचे देखील महाराष्ट्रामध्ये अतिशय चांगले उत्पादन येते.

**दिग्विजय** : हा वाण फुले जी-९१०२८ आणि भीमा या संकरातून निवड पद्धतीने महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे विकसित करण्यात आला असून, सन २००६ मध्ये महाराष्ट्रात लागवडीकरिता प्रसारित करण्यात आला आहे. हा वाण पिवळसर तांबूस रंगाचा, टपोऱ्या दाण्यांचा असून १०० दाण्यांचे वजन २४ ग्रॅम आहे. हा वाण मर रोग प्रतिकारक्षम असून वाढीचा कल निमपसरट, मध्यम उंच असून पाने, घाटे आकाराने मोठी व गर्द हिरवी असतात. या वाणाची पक्वता ११०- ११५ दिवसात येते. जिरायतात १४-१५ क्विंटल, बागायतात ३५ ते ४० क्विंटल तर उशिरा पेरणी केल्यास २०-२२ क्विंटल प्रतिहेक्टर उत्पादन या वाणापासून मिळते.

**राजस** : फुले जी-९१०२८ आणि भीमा या संकरातून हा वाण निवड पद्धतीने महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे विकसित करण्यात आला आहे. हा वाण सन २००५ मध्ये देशाच्या उत्तर पश्चिम (राजस्थान, पंजाब, हरियाणा, उत्तराखंड, नवी दिल्ली आणि जम्मू) विभागाकरिता उशिरा पेरणीसाठी प्रसारित करण्यात आला आहे. हा वाण पिवळसर तांबूस रंगाचा, टपोऱ्या दाण्यांचा असून मर रोग प्रतिकारक्षम आहे. या वाणापासून या विभागात उशिरा पेरणीपासून १८ ते २० क्विंटल प्रतिहेक्टरी उत्पादन मिळते. महाराष्ट्रात देखील हा वाण दिग्विजय वाणाप्रमाणे जिरायत, बागायत आणि उशिरा पेरणीस अतिशय चांगले उत्पादन देतो. जिरायतात १४ ते १५, बागायतात ३५ ते ४० क्विंटल तर उशिरा पेरणीस २० ते २२ क्विंटल प्रतिहेक्टर असे उत्पादन या वाणापासून मिळते.

**विजय** : हा वाण महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे पी-१२७० व अन्निगेरी या संकरातून निवड पद्धतीने विकसित करण्यात आला असून सन १९९३ मध्ये महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरात या तीन राज्यांसाठी राष्ट्रीय वाण म्हणून लागवडीकरिता प्रसारित करण्यात आला आहे. हा वाण मर रोग प्रतिकारक्षम असून त्याची पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता इतर वाणांपेक्षा अधिक आहे. हा वाण बुटका, पसरट असून पाने, घाटे व दाणे आकाराने मध्यम आहेत. या वाणाचे १०० दाण्यांचे वजन १९ ते २० ग्रॅम आहे. हा वाण जिरायतात ८५ ते ९० दिवसांत तर बागायतात १०५ ते ११० दिवसांत तयार होतो. या वाणाचे जिरायतात १४ ते १५ क्विंटल तर बागायतात ३५ ते ४० क्विंटल आणि उशिरा पेरणी केल्यास १६ ते १८ क्विंटल प्रतिहेक्टरी उत्पादन मिळते. तसेच इतर विकसित वाणांच्या तुलनेत या वाणाची पक्वता जिरायतात लवकर येते.

**फुले जी १२** : हा वाण ग्वाल्हेर ५/७ व सिलोन २ या संकरातून निवड पद्धतीने महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे विकसित करण्यात आला असून, सन १९८९ मध्ये तो महाराष्ट्र राज्यासाठी जिरायत तसेच बागायत क्षेत्रासाठी प्रसारित करण्यात आला आहे. या वाणापासून जिरायतात १२ ते १३ क्विंटल तर बागायतात २८ ते ३० क्विंटल प्रतिहेक्टर उत्पादन मिळते. या वाणाचा रंग आकर्षक पिवळसर तांबूस असून, १०० दाण्यांचे वजन १८ ग्रॅम आहे.

**विशाल** : हा वाण के-८५० व आय.सी.सी.एल. ८००७४ या संकरातून निवड पद्धतीने महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे विकसित करण्यात आला असून, सन १९९५ मध्ये पश्चिम महाराष्ट्रासाठी लागवडीकरिता प्रसारित करण्यात आला आहे. हा वाण आकर्षक पिवळ्या टपोऱ्या दाण्याचा असून १०० दाण्यांचे वजन २८ ग्रॅम आहे. यामुळे अधिक बाजारभाव मिळतो. हा वाण मर रोग प्रतिकारक्षम असून, प्रथिनांचे प्रमाणही अधिक आहे. वाढीचा कल निमपसरट, मध्यम उंच असून पाने, घाटे आकाराने मोठे असून गर्द हिरवे असतात. या वाण ११० ते ११५ दिवसांत तयार होतो. या वाणापासून जिरायतात १४ ते १५ क्विंटल तर बागायतात ३० ते ३५ क्विंटल प्रतिहेक्टर उत्पादन मिळते.

**बी.डी.एन.जी. ७९७** : हा वाण मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या बदनापूर संशोधन केंद्राने संशोधित केला असून मराठवाडा विभागासाठी प्रसारित करण्यात आला आहे. या वाणाचे दाणे मध्यम आकाराचे असून १०० दाण्यांचे वजन १८ ते २० ग्रॅम आहे. मर रोगाला प्रतिकारक्षम असणारा हा वाण अवर्षण प्रतिकारक्षम आहे. या वाणापासून जिरायतात १४ ते १५ क्विंटल तर बागायतात २० ते २२ क्विंटल प्रतिहेक्टर उत्पादन मिळते.

**साकी ९५१६** : हा वाण डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे विकसित करण्यात आला असून, सन २००२ मध्ये मध्य भारताकरिता बागायत लागवडीसाठी

प्रसारित करण्यात आला आहे. हा वाण मध्यम दाण्यांचा असून १०० दाण्यांचे वजन १८ ते २० ग्रॅम आहे. जिरायतात या वाणापासून १४ ते १५ क्विंटल तर बागायतात २४ ते २६ क्विंटल प्रतिहेक्टर उत्पादन मिळते. हा वाण मर रोग प्रतिकारक्षम आहे.

**जाकी ९२१८ :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे हा वाण विकसित करण्यात आला असून, सन २००५ मध्ये विदर्भाकरिता प्रसारित करण्यात आला आहे. हा वाण मर रोग प्रतिकारक्षम असून १०० दाण्यांचे वजन २२ ते २६ ग्रॅम आहे. हा वाण जिरायतात १५ ते १६ क्विंटल तर बागायतात २६ ते २८ क्विंटल प्रतिहेक्टर उत्पादन देतो.

**हिरवा चाफा (ए.के.जी.एस. १) :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे हा वाण विकसित करण्यात आला असून, सन १९९७ मध्ये विदर्भ विभागाकरिता प्रसारित करण्यात आला आहे. या वाणाचे दाणे हिरव्या रंगाचे असून १०० दाण्यांचे वजन १५ ते १६ ग्रॅम आहे. या वाणापासून जिरायतात १२ ते १३ क्विंटल तर बागायतात २० ते २२ क्विंटल प्रतिहेक्टर उत्पादन मिळते.

**फुले विक्रम :** हा वाण संकरातून निवड पद्धतीने महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे विकसित करण्यात आला असून, सन २०१७ मध्ये तो महाराष्ट्र राज्यासाठी जिरायत, बागायत क्षेत्रासाठी तसेच उशिरा पेरणीसाठी प्रसारित करण्यात आला आहे. वाढीचा कल उंच असल्यामुळे हा वाण यांत्रिक पद्धतीने (कम्बाईन हार्वेस्टरने) काढणी करण्यास उपयुक्त आहे. अधिक उत्पादन क्षमता, मर रोग प्रतिकारक, जिरायत, बागायत तसेच उशिरा पेरणीस योग्य असा वाण आहे.

## काबुली वाण

**विराट :** महात्मा फुले कृषी विद्यापीठाने हा काबुली वाण विकसित केला असून, सन २००१ मध्ये महाराष्ट्र राज्याकरिता लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे. हा काबुली वाण अधिक टपोऱ्या दाण्यांचा असून, १०० दाण्यांचे वजन ३५ ग्रॅम आहे. ११० ते ११५ दिवसांत या वाणाची पक्वता येते. हा वाण टपोऱ्या दाण्यांचा असल्यामुळे बाजारात अधिक बाजारभाव मिळतो. हा वाण मर रोग प्रतिकारक्षम असून जिरायतात या वाणापासून १० ते १२ क्विंटल तर बागायतात ३० ते ३२ क्विंटल प्रतिहेक्टर उत्पादन मिळते.

**विहार :** महात्मा फुले कृषी विद्यापीठाने हा काबुली वाण विकसित केला असून, सन २००२ मध्ये हा वाण कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि ओरिसा राज्यांकरिता लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे. हा काबुली वाण टपोऱ्या दाण्यांचा असून १०० दाण्यांचे वजन ३५ ग्रॅम आहे. यामुळे या वाणास अधिक बाजारभाव मिळतो. हा वाण मर रोग प्रतिकारक्षम असून जिरायतात या वाणापासून १० ते १२ क्विंटल तर बागायतात ३० ते ३२ क्विंटल प्रतिहेक्टर उत्पादन मिळते. दक्षिण भारतात याची पक्वता ९० ते ९५ दिवसांत येते. महाराष्ट्रात मात्र पक्वता कालावधी ११० ते ११५ दिवस आहे. महाराष्ट्रात देखील या वाणापासून विराटसारखेच चांगले उत्पादन मिळते.

**काक-२ (पीकेव्ही काबुली २) :** हा वाण डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ येथे विकसित केला असून, सन २००० मध्ये महाराष्ट्र राज्यासाठी प्रसारित करण्यात आला आहे. हा वाण मर रोग प्रतिकारक्षम असून, या वाणाचे दाणे अधिक टपोरे आहेत. १०० दाण्यांचे वजन ३७ ते ४० ग्रॅम आहे. हा वाण १०५ ते ११० दिवसांत पक्व होतो. या वाणापासून २६ ते २८ क्विंटल हेक्टरी उत्पादन बागायतात मिळते.

**कृपा :** महात्मा फुले कृषी विद्यापीठाने हा जास्त टपोऱ्या दाण्याचा काबुली वाण विकसित केला असून सन २००९ मध्ये महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि कर्नाटक राज्यांकरिता लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे. हा काबुली वाण अधिक टपोऱ्या दाण्यांचा असून १०० दाण्यांचे वजन ५९.४ ग्रॅम आहे. १०५ ते ११० दिवसांत या वाणाची पक्वता येते. हा वाण काबुली आणि अधिक टपोऱ्या दाण्यांचा, तसेच दाण्यांचा रंग सफेद पांढरा असल्यामुळे बाजारात आकर्षक बाजारभाव मिळतो. हा वाण मर रोगास मध्यम प्रतिकारक्षम असून या वाणापासून १६ ते १८ क्विंटल प्रतिहेक्टर उत्पादन मिळते. याची अधिकतम उत्पादन क्षमता ३२ क्विंटल प्रतिहेक्टर अशी आहे.

**पीकेव्ही ४-१ :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे हा काबुली वाण विकसित केला असून, सन २००८ मध्ये विदर्भ विभागाकरिता लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे. हा काबुली वाण अधिक टपोऱ्या दाण्यांचा असून, १०० दाण्यांचे वजन ५० ते ५३ ग्रॅम असते. १०५ ते ११० दिवसांत या वाणाची पक्वता येते. हा वाण काबुली आणि अधिक टपोऱ्या दाण्यांचा असल्यामुळे बाजारात चांगला बाजारभाव मिळतो. हा वाण मर रोगास मध्यम प्रतिकारक्षम असून या वाणापासून सरासरी १६ ते १८ क्विंटल प्रतिहेक्टर उत्पादन मिळते.

या काबुली वाणांव्यतिरिक्त आय.सी.सी.व्ही. २ (श्वेता) आणि एल ५५० या वाणांची पूर्वी शिफारस केली होती पण या दोन्ही काबुली वाणांचे दाणे लहान आकाराचे (१०० दाण्यांचे वजन १५ ते २० ग्रॅमपर्यंत) असतात. शिवाय हे दोन्ही वाण मर रोगाला बळी पडतात. म्हणून त्याऐवजी विराट, पीकेव्ही २, पीकेव्ही ४ अथवा कृपा हे वाणच निवडावेत. ■